तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५

आतील पानावर

पान २ –सुनील शेट्टीच्या 'केसरी वीर' ...
पान ३ – हिना बॉयफ्रेंड रॉकीसोबत करतेय लग्न?
पान ४ – 'सिम्बा'नंतर रणवीर अन् सारा पुन्हा...
पान ५ – 'देवमाणूस'मध्ये दिसणार महेश मांजरेकर
पान ७ – 'हा' फक्त चित्रपट नाही, तर एक ...

# 'छावा'चा बॉक्स ऑफिसवर जलवा!

'छावा' चित्रपट नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आणि या सिनेमाने प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर अपेक्षेप्रमाणे अधिराज्य गाजवलेलं आहे. विकी कौशल, रश्मिका मंदाना, अक्षय खन्ना यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'छावा' सिनेमाला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रेमाबद्दल विकीने देखील पोस्ट शेअर करत कृतज्ञता व्यक्त केली आहे.

'व्हॅलेंटाईन डे'ला या सिनेमाला चांगला प्रतिसाद मिळाला. लोकांनी चित्रपटगृहांमध्ये जाऊन व्हॅलेंटाईन डे ऐवजी यंदा 'छावा दिवस' साजरा केल्याचं पाहायला मिळालं. यामुळे १४ फेब्रुवारीला सर्वाधिक कमाई करणारा 'छावा' हा पहिला सिनेमा ठरला आहे.

'ओम नमः पार्वती पतये हर हर महादेव', 'हे हिंदवी स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा' असे संवाद असलेले प्रसंग पाहून आपसूकच अंगावर येणारा काटा आणि 'हर हर महादेव' व 'छत्रपती संभाजी महाराज की जय'च्या घोषणांनी देशभरातील चित्रपटगृह दुमदुमली आहेत. छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा धगधगता इतिहास मांडणाऱ्या बहुप्रतीक्षित 'छावा' या हिंदी चित्रपटाची तिकीट खिडकीवर यशस्वी घौडदौड सुरू आहे. ऐतिहासिक कथेला कलाकारांच्या दमदार अभिनयाची आणि वैशिष्ट्यपूर्ण सिनेमॅटोग्राफीची जोड मिळाली असून या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मॅडोक फिल्म्सने दिलेल्या माहितीनुसार, 'छावा'ने प्रदर्शनानंतर ४ दिवसांत संपूर्ण भारतात एकूण १४५.५३ कोटी रुपयांची कमाई केली आहे. विशेष बाब म्हणजे 'छावा' चित्रपटाचे देशातील विविध ठिकाणांसह मुंबईतील गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतही चित्रीकरण झाले आहे. 'छावा' चित्रपटातील थरारक दृश्ये आणि संवाद प्रेक्षकांच्या थेट हृदयाला भिडत असून आपसूकच डोळ्यात पाणी येत आहे. तसेच चित्रपट पाहून झाल्यानंतर समाजमाध्यमांवर चित्रफिती व छायाचित्रे टाकून भरभरून चित्रपटाबाबत लेखन केले जात आहे. तसेच प्रेक्षकांकडूनही मोठ्या प्रमाणात मौखिक प्रसिद्धी केली जात आहे.

शिवाजी सावंत यांच्या 'छावा' या कादंबरीवर आधारित 'छावा' या चित्रपटाचे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केले आहे. छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका अभिनेता विकी कौशल याने साकारली असून दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना 'महाराणी येसूबाई' यांच्या भूमिकेत झळकत आहे. तर अभिनेता अक्षय खन्ना औरंगजेबाच्या भूमिकेत आहे. या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये कमालीचे आकर्षण असून चित्रपटगृहांबाहेर तिकीट खरेदी करण्यासाठी मोठ्या रांगा लागत आहेत. तसेच ऑनलाईन माध्यमातून तिकिटांचे मोठ्या प्रमाणात आगाऊ आरक्षण केले जात असून क्षणार्धात चित्रपटगृह हाऊसफुल्ल होत आहेत.

तब्बल १३० कोटी रुपये खर्च करून चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून बजेटची संपूर्ण रक्कमही वसूल झालेली आहे.



# रिचा चड्ढाने केली 'या' नव्या चित्रपटाची घोषणा



बॉलीवूड अभिनेत्री रिचा चड्ढाने तिच्या आगामी चित्रपटाची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाची कथा रिच-ानेच स्वत: लिहिली आहे. व्हॅलेंटाईन डेच्या खास मुहूर्तावर अभिनेत्री रिचाने तिच्या चाहत्यांना हे गिफ्ट दिले आहे. तसेच स्वत:च लिहिलेल्या चित्रपटात ती अभिनय देखील करणार आहे. मात्र, या चित्रपटाचे दिग्दर्शन कोण करणार याबद्दल माहिती मिळू शकलेली नाही. कोरोनाच्या काळात स्वतः या चित्रपटाची कथा लिहिली असून या चित्रपटाचे नाव लास्ट मंडे असे ठेवण्यात आल्याचे रिचाने सांगितले. रिचा एक निर्माती म्हणून खूश नव्हती. यामुळे लॉकडाऊनच्या काळात तिने एक कथा लिहिली. आता ती स्वतः या चित्रपटात अभिनय करणार आहे. या चित्रपटासाठी रिचा खूप उत्सुक आहे. चित्रपटाची कथा एका टीव्ही रिलिटी शोच्या निर्मात्याची आहे. ऑफिसमध्ये कोणीतरी या निर्मात्याला 'बालिश कॅट लेडी' म्हणते, तेव्हा ती त्याच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेते, अशी वनलाइन स्टोरी या चित्रपटाची असल्याचे रिचाने सांगितले. रिचा ही एका मध्यमवर्गीय पंजाबी कुटुंबात वाढली आहे. यामुळे तिचे तिच्या कुटुंबातसोबतच्या अनेक आठवणी आणि अनुभव आहेत. माझ्या सर्व मोठ्या चुलत भावांची लग्ने ठरलेली आहेत. ही कथाही अशीच आहे जी एका कुटुंबाभोवती फिरते, हा एक कौटुंबिक चित्रपट आहे. तुम्ही ३० वर्षांचे झाल्यावर तुम्हाला नोकरी आणि कुटुंब दोन्ही मिळण्याची आशा आहे, परंतु समाजाला वाटते की आता उशीर झाला आहे आणि तुम्ही थकले आहात कारण ही स्वप्ने आता साध्य होणार नाहीत, असा प्रश्न करत ती म्हणते 'आखरी सोमवार' हा देखील असाच एक चित्रपट आहे, यातली कथा आधी तोडण्याची आणि नंतर एकत्र येण्याची आहे. एक अभिनेत्री म्हणून माझ्या कॉमिक टायमिंगचा खूप कमी वापर या चित्रपटात केल्याचे तिने सांगितले.

# सुनील शेट्टीच्या 'केसरी वीर' सिनेमाचा टीझर

अभिनेता सुनील शेट्टी, विवेक ओबेरॉय आणि सूरज पांचोली यांची प्रमुख भूमिका असलेला बहुप्रतिक्षित 'केसरी वीर: लिजेंड्स ऑफ सोमनाथ' या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. या टीझरमध्ये कलाकार योद्ध्यांची शौर्यगाथा सांगताना दिसत आहेत. हा चित्रपट वीर हमीरजी गोहिल यांच्यावर आधारित असून, त्यांनी गुजरातमधील सोमनाथ मंदिर वाचवण्यासाठी लढा दिला होता. या पीरियड-ड्रामा चित्रपटात वीर योद्धा हमीरजी यांची भूमिका अभिनेता सूरज पांचोली साकारत आहे. चित्रपटाचा धमाकेदार टीझर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला असून, यातील ॲक्शन सिक्वेन्स, जबरदस्त संवाद आणि शौर्याने भरलेले दृश्य प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. 'धर्म, आस्था आणि सोमनाथच्या पवित्र भूमीच्या रक्षणासाठीचा संग्राम', असे कॅप्शन देत सिनेमाचा टीझर रिलीज करण्यात आला आहे. या चित्रपटात अभिनेता विवेक ओबेरॉय खलनायकाची भूमिका साकारताना दिसेल. तर सूरज पंचोली त्याची आतापर्यंतची सर्वात वेगळी भूमिका या चित्रपटात साकारेल. अभिनेता सुनील शेट्टी सोमनाथ मंदिर वाचवण्यासाठी सूरज पंचोलीच्या साथीदाराच्या भूमिकेत दिसेल. या सिनेमात अभिनेत्री आकांक्षा शर्माची देखील महत्त्वाची भूमिका आहे. या चित्रपटाद्वारे आकांक्षा बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. या चित्रपटाच्या शूटिंग वेळी अभिनेता सूरज पंचोलीला गंभीर दुखापत झाली होती. दरम्यान, 'केसरी वीर: लिजेंड्स ऑफ सोमनाथ' या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रिन्स धीमान यांनी केले आहे. हा सिनेमा १४ मार्चला मोठ्या पडद्यावर रिलीज होईल.



# 'आय अ‍ॅम नॉट'मध्ये नवाजुद्दीन



बॉलीवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी स्वत:च्या चाहत्यांसाठी नवा चित्रपट घेऊन आला आहे. अभिनेत्याच्या आगामी चित्रपटाचे नाव 'आय ॲम नॉट ॲन ॲक्टर' आहे. निर्मात्यांनी या चित्रपटाचा ट्रेलर सार केला असून याच्या प्रारंभी दोन अभिनेते एका ऑडिशनमध्ये भाग घेताना आणि व्हिडिओ चॅटवर संभाषण करताना दिसून येतात. 'अभिनयाची कला आणि क्राफ्टसाठी एका प्रशंसेसोबत एका अभिनेत्याच्या जीवनासाठी देखील' असे दिग्दर्शकाने ट्रेलर शेअर करत नमूद केले आहे. या चित्रपटाची निर्मिती मुंबा देवी मोशन पिक्चर्सकडून करण्यात आली आहे. चित्रपटात नवाजुद्दीनसोबत चित्रांगदा सतरुपा भूमिकेत आहे. चित्रपटाचा वर्ल्ड प्रीमियर कॅलिफोर्नियात 'सिनेक्वेस्ट फिल्म फेस्टिव्हल २०२५'मध्ये होणार आहे. आदित्य कृपलानीकडून दिग्दर्शित हा हिंदी-इंग्रजी ड्रामा पूर्णपणे मुंबईतील अभिनेत्याची कहाणी दर्शविणारा आहे. नवाजुद्दीन यापूर्वी 'रौतू का राज'मध्ये मुख्य भूमिकेत दिसून आला होता. याचबरोबर नवाजुद्दीन हा मॅडॉक फिल्म्सच्या 'थामा' या चित्रपटात आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांच्यासोबत दिसून येणार आहे.



# राजेश खन्नांची नात आणि बिगबींचा नातू दिसणार एकत्र

अभिनेते राजेश खन्ना आणि अमिताभ बच्चन यांनी अनेक बॉलीवूड चित्रपटांमध्ये काम केले आहे. या दोघांचा 'आनंद' हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. आजही हा चित्रपट तेवढ्याच आवडीने पाहिला जातो. या अभिनेत्यांनंतर त्यांची पुढची पिढी देखील आता बॉलीवूडकडे वळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजेश खन्ना यांची नात नओमिका सरन आणि अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा यांचा एकत्र चित्रपट येणार आहे. या चित्रपटात रोमान्स आणि कॉमेडी पाहायला मिळणार आहे. नओमिका सरन ही राजेश खन्ना यांची मुलगी रिंकी खन्ना यांची मुलगी आहे. तर अगस्त्य नंदा हा अमिताभ बच्चन यांची मुलगी श्वेता नंदा यांचा मुलगा आहे. हे दोघेही आता नव्या चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. मॅडॉक फिल्म्सतर्फे या चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. तर किस्मत, किस्मत २, शड्डु या चित्रपटांचे दिग्दर्शन करणारे जगदीप सिद्धू या चित्रपटाचे दिग्दर्शन करतील. नओमिकाचा हा पहिलाच चित्रपट आहे. नओमिकाची आई रिंकी खन्नाने अभिनेता गोविंदाच्या 'जिस देश मे गंगा रहता है' या चित्रपटात काम केले होते. मात्र रिंकी खन्नाला सिनेसृष्टीत फारसे यश मिळालेले नाही. नओमिका सरन ही सोशल मीडियावर चर्चेत असते. तर अगस्त्य नंदाचा याआधी 'द आर्चीज' हा चित्रपट आलेला आहे. त्यानंतर आता लवकरच लेफ्टनंट अरुण खेतरपाल यांच्या जीवनावर आधारलेल्या इक्कीस या चित्रपटातही तो दिसणार आहे. यात अगस्त्य धर्मेंद्र आणि जयदीप अहलावत सारख्या कलाकारांसोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे.






# हिना करतेय बॉयफ्रेंड रॉकीसोबत लग्न ?

बॉलिवूडमध्ये अभिनेत्री हिना खान सध्या ब्रेस्ट कॅन्सरशी लढा देत आहे. मात्र या आजाराचा सामना ती मोठ्या खंबीररित्या सामना करत आहे. आजाराच्या प्रत्येक ट्रीटमेंटबाबत ती सोशल मीडियावर चाहत्यांसोबत माहिती शेअर करत असते. यातच आता सोशल मीडियावर हिना खानचा प्रियकर रॉकी जयस्वालसोबतचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ पाहून दोघे लग्न करताय का? असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. मात्र हा व्हिडीओ 'सेलिब्रिटी शेफ्स'च्या सेटवरील आहे. जिथे हिना खान तिच्या बॉयफ्रेंडसह पोहोचली होती. तिथं तिचं भव्य स्वागत करण्यात आलं. व्हिडीओमध्ये हिना खान पिवळ्या रंगाच्या सूटमध्ये अगदी सुंदर दिसते. तर रॉकी पांढऱ्या शेरवानीमध्ये पाहायला मिळतो. दोघेही पाहुणे म्हणून या शोमध्ये आले होते. यावरून या भागाच्या थीम वेडिंगवर असू शकते, असा अंदाजही वर्तवला जात आहे. व्हिडिओमध्ये, पाहू शकता की सेलिब्रिटी शेफचे स्पर्धक हिना आणि रॉकी येताच डान्स करतात. त्याच वेळी, शोच्या स्पर्धक उषा नाडकर्णी या दोघांचे स्वागत करीत आहे. यावर हे दोघे लग्न करत आहेत? असा सवाल करत आहेत. दरम्यान, हिना खान आणि रॉकी जयस्वाल बऱ्याच वर्षांपासून एकमेकांना डेट करत आहेत, हिनाच्या कठीण काळात रॉकी तिच्या प्रत्येक क्षणी तिच्याबरोबर उभा राहिला आहे. याबाबत खास पोस्ट शेअर करत देखील तिने आपले प्रेम व्यक्त केले आहे. ३' हा चित्रपट १ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रदर्शित होणार आहे.





# 'सिम्बा'नंतर रणवीर अन् सारा पुन्हा एकत्र झळकणार?

रणवीर सिंग आणि सारा अली खान यांची मुख्य भूमिका असलेला 'सिम्बा' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलाच गाजला. ॲक्शन, ड्रामा, रोमान्स आणि कॉमेडीने परिपूर्ण असलेल्या या चित्रपटाचं दिग्दर्शन रोहित शेट्टीने केलं होतं. या चित्रपटात रणवीर एका पोलीस अधिकाऱ्याची भूमिकेत दिसला. एकंदरीत चित्रपटाचं कथानक त्यातील गाणी संवाद प्रेक्षकांच्या पसंतीस पडला होता. अशातच 'सिम्बा'च्या यशानंतर रणवीर सिंग आणि सारा अली खान ही जोडी रुपेरी पुन्हा पडद्यावर दिसण्याची शक्यता आहे. दरम्यान, रोहित शेट्टीने नुकताच सोशल मीडियावर शेअर केलेला एक व्हिडीओ चर्चेचा विषय ठरलाय. रोहित शेट्टीने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत आपल्या आगामी प्रोजेक्टबद्दल घोषणा केली आहे. रोहित शेट्टी लवकरच रोमकॉम चित्रपट तयार करणार आहे. या चित्रपटात रणवीर आणि सारा हे मुख्य भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे. ड्रामा, ॲक्शन आणि रोमान्स सब मिलेगा एक ही कहाणी में २०२५ का बिगेस्ट ब्लॉकबस्टर कमिंग सुन... असं कॅप्शन त्याने सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओला दिलंय. त्यामुळे चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे. शिवाय या व्हिडीओमध्ये साराचा कधीही न पाहिलेला अंदाज पाहायला मिळतोय. 'सिम्बा'मध्ये आपल्या केमिस्ट्रीने मने जिंकणारी ही जोडी पुन्हा एकदा स्क्रीन शेअर करणार आहे. त्यामुळे चाहत्यांनी सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओवर लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. दरम्यान, रोहित शेट्टीने त्याच्या या आगामी प्रोजेक्टबद्दल आणखी कोणतीही माहिती दिलेली नाही. रोहित शेट्टीच्या म्हणण्यानुसार हा २०२५ मधील सगळ्या मोठी रोमँन्टिक सिनेमा असणार आहे. परंतु अद्यापही या सिनेमाचं नाव रिव्हिल करण्यात आलेलं नाही.



# अजयचा 'या' दिग्दर्शकाशी १८ वर्षांपासून अबोला

अजय देवगण हा बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेता. अजय देवगणने आजवर संजय लीला भन्साली, रोहित शेट्टी, विशाल भारद्वाज अशा दिग्दर्शकांसोबत काम केलं. अजयच्या करिअरमध्येही असाही एक दिग्दर्शक आहे ज्याच्यासोबत अजयने एक सिनेमा केल्यानंतर आजवर तब्बल १८ वर्ष तो त्याच्याशी बोलला नाही. अजय देवगणने ज्या दिग्दर्शकाशी अबोला धरला त्याचं नाव आहे अनुभव सिन्हा. 'रा.वन', 'मुल्क', 'थप्पड' अशा संवेदनशील आणि सुपरहिट बॉलिवूड सिनेमांचं दिग्दर्शन अनुभव सिन्हा यांनी केलं. एका मुलाखतीत अनुभव म्हणाले की, माझं अजयचं कधीही भांडण झालं नाही. पण ते माझ्याशी बोलत नाही. मला याचं कारण माहित नाही. आम्ही दोघांनी एकत्र कॅश सिनेमासाठी काम केलं. तो मला टाळतोय असंही मी म्हणू शकत नाही. कदाचित मी या गोष्टीचा जास्त विचार करत असेल. पण मी अनेकदा अजय यांना मॅसेज केलाय. परंतु त्यांनी कधी मॅसेजला उत्तर दिलं नाही. कदाचित ते मॅसेजला रिप्लाय करायला विसरले असतील. पण गेली १८ वर्ष आम्ही एकमेकांशी बोललो नाहीये. निर्माते आणि फायनान्सर यांच्यातील काही मतभेद असतात. परंतु आमच्यात असं काही नाही. कोणत्या गाण्यावरुनही कसलाही वाद नाही. अजय माझा आवडत्या अभिनेत्यांपैकी एक आहे. अजय असा माणूस आहे जो मित्रांची गरज असेल तर पहिला धावून जातो. अशा शब्दात अनुभव यांनी अजयबद्दल भावना व्यक्त केल्या. अनुभवशी अजय का बोलत नाही, याचं कारण मात्र गुलदस्त्यातच आहे.



# मलायकाचा डान्स पाहून अर्जुन कपूर म्हणाला...


अभिनेत्री मलायका अरोरा व अर्जुन कपूर हे दोघे अनेक वर्षांपासून एकमेकांना डेट करत होते. मात्र, काही दिवसांपूर्वीच त्यांनी ब्रेकअप केल्याचे समोर आले. ब्रेकअप झाले असले तरी ते एकमेकांना नेहमी पाठिंबा देताना दिसतात. मलायकाच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर अर्जुनने तिच्या कठीण काळात तिची साथ दिल्याचे पाहायला मिळाले. आता पुन्हा एकदा मलायका व अर्जुन चर्चेत आले आहेत. अर्जुनने नुकतीच मलायका परीक्षक असलेल्या 'इंडियाज बेस्ट डान्सर व्हर्सेस सुपर डान्सर' या रिलिटी शोमध्ये हजेरी लावली. 'मेरी हजबंड की बीवी' या चित्रपटाच्या माध्यमातून अर्जुन लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने कलाकारांनी या रिलिटी शोमध्ये हजेरी लावली होती. 'इंडियाज बेस्ट डान्सर व्हर्सेस सुपर डान्सर'मध्ये मलायकाबरोबर रेमो डिसूझा व गीता कपूर यांनी स्पर्धकांबरोबर मलायकाच्या गाजलेल्या गाण्यांवर डान्स केला. अर्जुन व भूमी यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या डान्सनंतर या शोचे सूत्रसंचालन करणाऱ्या हर्ष लिंबाचियाने अर्जुन कपूरला त्याला डान्स कसा वाटला, यावर त्याची प्रतिक्रिया विचारली. यावर बोलताना अर्जुन कपूरने म्हटले, बऱ्याच वर्षांपासून मी अवाक आहे. मला आताही शांतच राहायला आवडेल, पण मला हे सांगायचे आहे की मला माझी आवडती गाणी ऐकण्याची संधी मिळाली. या गाण्यांमधून तिच्या करिअर व आयुष्याविषयी जाणून घेता येते. अशा प्रकारची गाणी, परफॉर्मन्स आणि आताही ती व्यक्ती ज्या पद्धतीने तिचे काम करीत आहे, त्यासाठी तिचे आपण कौतुक करू शकतो, त्यासाठी मलायका तुझे अभिनंदन. तुला माहीतच आहे की, मला ही गाणी किती आवडतात. अशा पद्धतीने तू हे सर्व साजरे करत आहेस, हे पाहून आनंद झाला, अर्जुनच्या या प्रतिक्रियेनंतर मलायकाने त्याला धन्यवाद म्हणत प्रतिसाद दिला.



# ललित प्रभाकरच्या 'प्रेमाची गोष्ट २'चा हटके टीझर

'व्हॅलेंटाईन डे'ला 'प्रेमाची गोष्ट २' या बहुप्रतीक्षित चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. सुपरहिट प्रेमकथा सादर करणारे दिग्दर्शक सतीश राजवाडे 'प्रेमाची गोष्ट २' निमित्ताने एक नवीन प्रेमकथा निर्माते संजय छाब्रिया यांच्यासह घेऊन येत आहेत. लग्नाच्या गाठी स्वर्गात जुळतात असं म्हणतात, पण जेव्हा प्रेम आणि नशीब आपल्या प्लॅनिंगनुसार ठरेल तेव्हा आयुष्यात काय घडेल? असंच काही या चित्रपटात ललितच्या बाबतीत घडणार आहे. प्रेम आणि नशीबाची ही जादुई सफर पाहाणं नक्कीच मनोरंजक ठरेल. या चित्रपटात महाराष्ट्राचा लाडका अभिनेता ललित प्रभाकर प्रमुख भूमिका साकारत आहे. अभिनेत्री ऋचा वैद्यसह हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीत आपली छाप सोडणारी अभिनेत्री रिधिमा पंडित ही चित्रपटात दिसेल. प्रेक्षकांना या तिन्ही कलाकारांची कमाल केमिस्ट्री पाहायला मिळेल. एव्हरेस्ट एंटरटेनमेंट प्रस्तुत 'प्रेमाची गोष्ट २' या चित्रपटाचे दिग्दर्शन सतीश राजवाडे यांनी केले असून निर्माते संजय छाब्रिया आहेत तर सह निर्माते अमित भानुशाली आहेत. प्रेक्षकांसाठी गाजलेल्या प्रेमकथा घेऊन येणारे सतीश राजवाडे आणि एव्हरेस्ट एंटरटेनमेंट आता आणखी एक प्रेमकथा घेऊन येत असल्याने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. प्रेम आणि नशीबाचा हा जादुई प्रवास येत्या जून २०२५ मध्ये अनुभवायला मिळेल.

विशेष गोष्ट म्हणजे सिनेमात स्वप्नील जोशीचा आवाज बॅकग्राऊंडला दिसतोय. गांजावाला, मनीष राजगिरे यांनी गाणी गायली आहेत. चित्रपटात अनिकेत विश्वासराव, हार्दिक जोशी, देविका दफ्तरदार, पृथ्विक प्रताप, विजय पाटकर, प्रदीप वेलणकर, सुरेश विश्वकर्मा, अरबाज शेख यांच्या प्रमुख भूमिका आहेत.





प्रसाद खांडेकर दिग्दर्शित 'चिकी चिकी बुबूम बूम' नवा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. अभिनेता स्वप्नील जोशी, प्राजक्ता माळी, प्रार्थना बेहेरे, वनिता खरात, प्रसाद शिवलकर, रोहित माने आणि स्वतः प्रसाद खांडेकर या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. २८ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्याया चित्रपटात नम्रता संभेरावचा कॅमिओदेखील आहे. या कॅमिओमागचा गंमतीशीर किस्सा नम्रताने सांगितला. या चित्रपटातील नुकतंच पहिलं गाणं प्रदर्शित झालं. यानिमित्ताने एक सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी नम्रता संभेरावने 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटातील अवघ्या चार वाक्यांच्या स्वतःच्या कॅमिओबद्दल सांगितलं. नम्रता म्हणाली की, 'जेव्हा प्रसादच्या डोक्यात या चित्रपटाबद्दल सुचलं तेव्हापासून मी त्याच्याबरोबर आहे. मला या

# नम्रताने स्विकारली चार वाक्यांची भूमिका

गोष्टीचं थोडं वाईटही वाटतं आणि चांगलं पण वाटतंय. 'नाच गं घुमा' चित्रपटासाठी माझं ऑलरेडी कास्टिंग झालं होतं, त्याचं शूटिंग सुरू होणार होतं, त्यादरम्यान या चित्रपटाबद्दल प्रसादच्या डोक्यात विचार आला. नेमकं त्या क्लॅशमुळे मला या चित्रपटाचं भाग होता आलं नाही. पण, मला हे सांगायला आवडेल या चित्रपटातलं माझं कास्टिंग मीच केलंय. अत्यंत महत्त्वाचं हे कास्टिंग आहे. पुढे नम्रता म्हणाली, आम्ही असंच प्रवासाला निघालो होतो, तेव्हा 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटात मला कसं घेता येईल? याची चर्चा सुरू होती. आमचा लेखक, सहकलाकार प्रथमेश शिवलकर तो म्हणाला, ताई मला पाच मिनिटं दे. आपण या चित्रपटात तुझ्यासाठी काहीतरी करुया. कारण माझ्याकडे दिवसचं नव्हते. मला या चित्रपटासाठी काम करायचं होतं. कारण आम्ही इतकी वर्ष एकत्र आहोत, तर मला या चित्रपटाच भाग व्हायचं होतं. त्यावेळी प्रथमेश पाच मिनिट दे म्हटला आणि तीन तास उठलाच नाही. चित्रपटाची गोष्ट मला माहीत असल्यामुळे मी माझं कास्टिंग मी केले. चित्रपटात जी शेवटची एन्ट्री आहे ती मी घेते, असं करून माझं कास्टिंग 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटासाठी मीच केलं आहे.

मागच्या काही दिवसांपूर्वी महेश मांजरेकर यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'देवमाणूस' चित्रपटाचं पहिलं पोस्टर भेटीला आलं. या पोस्टरमध्ये मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय कलाकारांची फौज दिसली. आता नुकताच 'देवमाणूस' चित्रपटाचा टिझर नुकताच रिलीज झालाय. या बहुप्रतिक्षित मल्टीस्टारर चित्रपटात मराठी सिनेसृष्टीतील दमदार कलाकार महेश मांजरेकर, रेणुका शहाणे आणि सुबोध भावे यांच्या प्रमुख भूमिका आहेत आणि त्यांच्यासोबत लोकप्रिय अभिनेता सिद्धार्थ बोडके हे सुद्धा आहेत. 'देवमाणूस'च्या टीझरमध्ये पाहायला मिळतं की, महेश मांजरेकर वारकर्याची भूमिका साकारताना दिसत आहेत. त्यांच्या पत्नीच्या भूमिकेत रेणुका शहाणे दिसत आहेत. तर पोलीस

# 'देवमाणूस'मध्ये दिसणार महेश मांजरेकर

इन्सपेक्टरच्या भूमिकेत सुबोध भावे आहे. सिनेमात दिसतं की, महेश मांजरेकर यांच्या कुटुंबावर काहीतरी संकट आलेलं असतं. या संकटावर मार्ग काढण्यासाठी महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे कसा तोडगा काढतात, या कहाणीची झलक 'देवमाणूस'च्या टीझरमध्ये पाहायला मिळतेय. बॉलिवूडमध्ये सुप्रसिद्ध सिनेमांची निर्मिती करणार्या लव फिल्म्सने 'देवमाणूस' निमित्ताने त्यांच्या पहिल्याच मराठी चित्रपटाची निर्मिती केली आहे. महेश मांजरेकर ह्यांना कधीही न पाहिलेल्या वारकरीच्या भूमिकेत 'देवमाणूस'मध्ये पाहायला मिळणार आहे. याशिवाय रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके यांचीही भूमिका अतिशय आकर्षक आणि जबरदस्त दिसत आहे. देवमाणूसचा टीझर संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहांमध्ये विकी कौशलच्या 'छावा' चित्रपटासह प्रदर्शित केला जाणार आहे.


देवमाणूस २५ एप्रिल २०२५ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होईल



# जिंदगी के सफर में गुजर जाते हैं जो मकाम...!

**भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. तसे पाहिले तर मानवी सभ्यता विकसित होत असताना पुरुषाचे कार्यक्षेत्र घराबाहेर तर स्त्रीचे कार्यक्षेत्र चार भिंतीच्या आत, अशी कार्य-विभागणी सर्व संस्कृतीत झालेली आढळते. शतकानुशतके हे गृहीतक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत अधिमान्य होते. कला व परंपरा यामध्येदेखील या गृहीतकाचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. नाट्य-कला विकसित होत असताना (मुख्यत्वे प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृती), त्यात 'नायक' ही संकल्पना तात्त्विक व वास्तविक अंगाने तपशिलाने विशद झाली होती. त्यानुसार सर्वसामान्यांपेक्षा सर्वच बाबतीत श्रेष्ठ असलेल्या, रूप, गुण, प्रभाव व काही पारलौकिक शक्ती आणि वरदान यांद्वारे आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या नायकाची परिकल्पना करण्यात आली होती. याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव प्रदर्शनी कलांवर अजूनही पडलेला आढळतो.**

भारतीय चित्रपटसृष्टीतही, विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात या संकल्पनेचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले आढळते. हिंदी चित्रपटसृष्टीतील तीन वेगवेगळ्या पठडीतील 'महानायक' यांच्याविषयी विविध अंगाने ऊहापोह करत असताना, एक बाब प्रकर्षाने लक्षात येते की, १९५० ते १९६० च्या दशकात या महानायकांचा प्रचंड प्रभाव असता तरीही त्यांचे विशिष्ट असे प्रभाव क्षेत्र होते व ठाशीव प्रतिमेच्या अधीन राहूनच त्यांचे चित्रपट बनत व प्रदर्शित होत. स्वातंत्र्योत्तर काळात जन्माला आलेली किंवा स्वातंत्र्याच्या थोड्याशा अगोदर जन्माला आलेली व साधारणत: १९६५ च्या सुमारास तारुण्यात पदार्पण केलेली रसिकांची पिढी या महानायकांशी म्हणावे तितके तादात्म्य पावू शकत नव्हती. एकीकडे त्यांच्यासमोर जगण्याचे प्रश्न उभे होते तर दुसरीकडे त्यांच्या विचारसरणी, जीवनशैली, वेशभूषा, केशभूषा यांच्यावर जाणवेल इतका पाश्चात्त्य पगडा होता तसेच स्वातंत्र्योत्तर सुरुवातीला असलेला भाबडा आशावाद हळूहळू टळटळीत व निराश वास्तववादाकडे झुकू लागला होता. भारतीयांना 'तारणहार' ही संकल्पना मनोमन पटते, रुचते व आवडते. आपल्या आशा, आकांक्षा, स्वप्ने रुपेरी पडद्यावर का होईना साकार होताना बघणे व ते देखील आपल्या लाडक्या नायकाद्वारे त्यांना विशेषत्वाने भावते. अशा संक्रमणकाळी हिंदी चित्रपटाच्या क्षितिजावर अवतीर्ण झाला, तुमच्या- आमच्यासारखा दिसणारा पण खूप काही असामान्य व विशेष गुण असलेला, आबालवृद्ध, रंक-राव यांना आपल्या व्यक्तिमत्त्व, देहबोली व शैलीदार वावर यांनी अक्षरश: खिळवून ठेवणारा 'सुपर स्टार' राजेश खन्ना..! २९ डिसेंबर १९४२ रोजी अमृतसर येथे जन्म झालेला, सुखवस्तू कुटुंबातील जतीन खन्ना, बालपणीच आपल्या काकांना दत्तक गेला व त्यांच्याकडे मुंबईस वास्तव्य करू लागला. १९६० च्या दशकाच्या सुरुवातीस त्याने साकारलेल्या 'अंधा युग' नाटकातील भूमिकेचे विशेष कौतुक झाले. १९६५ साली आयोजित झालेल्या अखिल भारतीय प्रतिभाशोध स्पर्धेत जतीन खन्ना विजयी झाले. स्पर्धेच्या नियमावलीनुसार त्यांना दोन चित्रपटांत नायकाची भूमिका करण्याची संधी प्राप्त झाली. नेमका त्याचवेळी 'जब जब फूल खिले' चित्रपटात जतीन खन्ना नावाचा एक खलनायक भूमिका करत असल्यामुळे, त्यांनी आपले मामा, के. के. तलवार यांनी सुचवलेले 'राजेश' हे नाव स्वत:साठी निवडले. राजेश खन्ना यांनी सर्वप्रथम 'राज' हा चित्रपट स्वीकारला, पण त्यांचा पहिला प्रदर्शित चित्रपट ठरला तो 'आखरी खत' (१९६६). 'राज' (१९६७) चित्रपटाने त्यांचे अभिनयगुण नजरेस आले. त्यानंतर आलेल्या 'औरत' व 'बहारों के सपने' (१९६७) या चित्रपटांनी राजेश खन्ना हिंदी चित्रपट रसिकांना एक ओळखीचे नाव झाले. पण व्यावसायिकदृष्ट्या ते चाचपडतच होते आणि मग उजाडले १९६९ हे वर्ष. नायिकाप्रधान चित्रपट 'आराधना' ज्यात कोणीही मोठा सितारा काम करायला तयार नव्हता व राजेश खन्नानेदेखील मोठ्या नाईलाजानेच ही दुहेरी भूमिका स्वीकारली होती. हा चित्रपट प्रचंड यशस्वी ठरला. नेपाळी डोळ्यांच्या व गाण्यात विशिष्ट आविर्भाव व हातवारे करणाऱ्या राजेश खन्नाने लोकप्रियतेचे नवीन आयाम प्रस्थापित केले. अर्थात, किशोरकुमार यांचे गायन व सचिन देवबर्मन यांच्या चिरतरुण संगीतरचना यांचादेखील या अभूतपूर्व यशात मोलाचा वाटा होता. त्याचवर्षी आलेल्या 'दो रास्ते' या कौटुंबिक चित्रपटाने राजेश खन्नास महिला वर्गाची विशेष मान्यता प्राप्त झाली. प्रियकर, लाडका भाऊ, तरुण मुलगा या रूपांमध्ये भारतीय समाजाने राजेश खन्नास पाहण्यास सुरुवात केली. याचवर्षी आलेल्या 'खामोशी' चित्रपटातील त्यांचे काम वाखाणल्या गेले. १९७० साली आलेल्या 'सच्चा झूठा', 'आन मिलो सजना', 'सफर' या चित्रपटांनी उत्तम यश मिळविले व त्यांची नाममुद्रा ठसठशीत केली. प्रसिद्ध सिनेपत्रकार व आपल्या फटकळ स्वभाव यामुळे एक वेगळा दबदबा असलेल्या देवयानी चौबळ यांनी राजेश खन्नाला 'सुपर स्टार' हे बिरूद बहाल तर केलेच; पण त्याच्या आयुष्याशीदेखील निगडित केले. १९७२ साली आलेल्या 'अमर प्रेम' चित्रपटातील त्यांचा अंतर्यामी दु:खी आनंदबाबू रसिकांना प्रचंड भावला. १९७३ साली आलेल्या 'दाग', 'आप की कसम', 'प्रेम नगर' व अर्थात 'नमक हराम' या चित्रपटांनी राजेश खन्नाचे चलनी नाणे खणखणीत वाजले. पण दुर्दैवाने हे वर्ष त्यांच्या सुपरस्टार पदाचे व आसेतुहिमाचल छप्पर-फाड लोकप्रियतेचे शेवटचे वर्ष ठरले. याचवर्षी त्यांनी डिम्पल कापडिया यांच्याशी विवाह करून खळबळ उडवून दिली. १९७४ साली आलेला 'रोटी' अती-यशस्वी ठरला, पण राजेश खन्नाच्या लकबी व अभिनयशैलीत तोच तो पणा जाणवू लागला. व्यावसायिक शिस्त, वक्तशीरपणा व सहकलाकारांना सांभाळून घेण्याची वृत्ती याचा त्यांच्यामध्ये जाणवण्याइतका अभाव होता. खुषमस्कऱ्यांचा घोळका अवतीभवती राखून निर्माता-दिग्दर्शक यांना आपल्या तालावर नाचवणाऱ्या राजेश खन्ना यांनी नको ते चित्रपट स्वीकारून व त्याच्या पटकथा संवादमध्ये मनमाने बदल करवून आपल्या अपयशाचा जणूकाही पायाच रचला. १९७५ ते १९७८ ही वर्ष त्यांना व्यावसायिक दृष्टीने अतिशय वाईट गेली, पण ते पटलावरून लुप्त झाले नाहीत. भारतीय मानसिकतेशी सुसंगत चित्रपट व त्याला साजेशी प्रस्तुती हे त्यांचे बलस्थान होते. १९८० साली 'थोडी सी बेवफाई', 'बंदिश', १९८१ साली 'कुदरत', 'दर्द', 'फिफ्टी-फिफ्टी', 'धनवान' या चित्रपटांच्या यशाने राजेश खन्ना परत एकदा चर्चेत आले. पण याच सुमारास आलेले जनता हवालदार, अमरदीप, चक्रव्यूह आणि रेड रोज यांसारखे वेगळे चित्रपट राजेश खन्ना यांचा उत्तम अभिनय असूनही फारसे यश मिळवू शकले नाहीत, हे दुर्दैव..!




१९८३ साली आलेल्या 'अवतार' व 'सौतन' चित्रपटांच्या तडाखेबंद यशाने राजेश खन्ना लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झाले, पण हे क्षणिक यश ठरले. तद्नंतर, अचानकच राजेश खन्ना यशास विन्मुख झाले. 'आखिर क्यों', 'अमृत' हे चित्रपट यशस्वी झाले, पण त्याचा त्यांना फारसा फायदा झाला नाहीच. १९८० च्या दशकाच्या प्रारंभ आलेले स्टार-पुत्र, १९९० च्या दशकात आलेले खानांचे आक्रमण यांनी त्यांची सद्दी मोडून काढली. त्यांनी निर्माण केलेला 'अलग अलग' चित्रपट तिकीटबारीवर साफ कोसळला. त्यांचा महत्त्वाकांक्षी चित्रपट 'जय शिवशंकर' (१९९०) पूर्ण झाला, पण तो प्रदर्शित होऊ शकला नाही. वैयक्तिक पातळीवरही १९८० चे दशक त्यांना चढ-उताराचेच ठरले. १९९० च्या दशकात त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश करून नवी दिल्लीतून लोकसभा निवडणूक लढवली. त्यात ते लालकृष्ण अडवाणी यांच्याकडून फक्त १५८९ मतांनी पराभूत झाले (१९९१ ची लोकसभा). १९९२ च्या पोटनिवडणुकीत मात्र ते विजयी झाले, ते शत्रुघ्न सिन्हा यांना पराभूत करून. १९९६ ची लोकसभा निवडणूक हरल्यानंतर त्यांनी राजकारणाला निरोप दिला. नवीन सहस्रकात त्यांची प्रकृती ढासळू लागली. त्यांच्या दोन्ही कन्या ट्विंकल खन्ना व रिंकल खन्ना चित्रपटसृष्टीत नायिका म्हणून चमकल्या, पण त्यांना अपेक्षित यश मिळू शकले नाही. त्यांचे जावई अक्षयकुमार हे यशस्वी अभिनेता आहेत. पत्नी डिम्पल कापडिया शेवटच्या वर्षांमध्ये त्यांच्यासम वेत होती. हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वाधिक यशस्वी व सर्वात जास्त 'एकल नायक' चित्रपटांचा नायक म्हणून देदीप्यमान यश प्राप्त केलेले राजेश खन्ना.. खूप काही राजा, थोडेसे ईश व टोपण नावानुसार 'छोटा गोंडस मुलगा'..! आपले बालहट्ट त्यांनी आयुष्यभर राजहट्ट म्हणून जपले व मिरवले. सामान्य रसिकांचा लाडका असामान्य अभिनेता, राजेश खन्ना..! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

**देवेंद्र श्रीनिवास प्रभुणे**

# मिलिंद गवळी पुन्हा येणार प्रेक्षकांच्या भेटीस

स्टार प्रवाह वाहिनीवरील 'आई कुठे काय करते' ह्या मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. मात्र या मालिकेतील पात्र आजही प्रेक्षकांच्या मनात कायम आहेत. या मालिकेतील अनिरुद्ध देशमुख अर्थात अभिनेते मिलिंद गवळी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'स्टार प्रवाह'च्या 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेत माजी समाजकल्याण मंत्री यशवंतराव भोसलेंची भूमिका ते साकारणार आहेत. मालिकेत सध्या पार्थ-नंदिनीच्या लग्नाची धामधूम सुरु आहे. यातच आता यशवंतराव भोंसलेंची यात एन्ट्री होणार आहे. 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेतील भूमिकेविषयी सांगताना मिलिंद गवळी म्हणाले, साधारण तीन महिन्यांनंतर पुन्हा सेटवरचं वातावरण अनुभवतोय. अनिरुद्ध या पात्रावर प्रेक्षकांनी मनापासून प्रेम केलं. आजही प्रेक्षक या पात्राला विसरलेले नाही. 'लग्नानंतर होईलच प्रेम' मालिकेतली भूमिका खूप वेगळी आहे. मी सुद्धा हे पात्र साकारण्यासाठी प्रचंड उत्सुक आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'लग्नानंतर होईलच प्रेम' मालिकेचे निर्माते शशांक सोळंकी आणि मी एका कॉलेजमध्ये शिकलो आहोत. कॉलेजपासूनची ही मैत्री आजपर्यंत घट्ट आहे.

जवळच्या मित्राच्या मालिकेत ही खास भूमिका साकारायला मिळतेय याचा आनंद वेगळा आहे. याशिवाय 'स्टार प्रवाह'बरोबर एक वेगळं जिव्हाळ्याचं नातं आहे. त्यामुळे ही भूमिका खूपच स्पेशल आहे, असेही ते म्हणाले. काही दिवसांपूर्वीच 'आई कुठे काय करते' मालिकेची मुख्य नायिका अरुंधती म्हणजेच मधुराणी प्रभुलकर 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' या मालिकेत झळकली होती.



# राम चरणला मिळाला एक पौराणिक चित्रपट

दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण सध्या अनेक चित्रपटांच्या निर्मितीमध्ये व्यस्त आहे. अभिनेत्याचा शेवटचा प्रदर्शित झालेला 'गेम चेंजर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारसा कमाल करू शकला नाही. आता, अभिनेत्याला त्याच्या आगामी 'आरसी १६' चित्रपटाकडून खूप आशा आहेत. दरम्यान, अभिनेत्याच्या नवीन चित्रपटाबद्दल एक मनोरंजक माहिती समोर आली आहे. आता राम चरणला बॉलिवूड दिग्दर्शकाचा नवीन चित्रपट मिळाला आहे. रिपोर्ट्सनुसार, राम चरण आता बॉलिवूड दिग्दर्शक निखिल नागेश भट यांच्याशी चर्चेत आहे, ज्यांनी समीक्षकांनी प्रशंसित हिंदी चित्रपट 'किल'चे दिग्दर्शन केले आहे. निखिल नागेश या टॉलीवूड अभिनेत्यासोबत एक मोठ्या बजेटचा पौराणिक चित्रपट बनवण्याचा विचार करत असल्याचे म्हटले जाते. रिपोर्ट्सनुसार, हा एक मोठ्या बजेटचा आणि लार्जर- दॅन-लाइफ ड्रामा आहे जो भारतीय पौराणिक कथेतील सर्वात प्रमुख पात्रांपैकी एकाच्या पार्श्वभूमीवर बेतलेला आहे.
दिग्दर्शकाने प्री-व्हिज्युअलायझेशन भाग आधीच पूर्ण केला आहे आणि राम चरणसोबत त्यावर काम करण्यास उत्सुक आहे. चरण लवकरच अंतिम निर्णय घेईल आणि RC16 नंतर हा त्याचा तात्काळ प्रकल्प असू शकतो. निखिल नागेश भट आता सोशल मीडियावर राम चरणला फॉलो करत आहे, ज्यामुळे अफवांना आणखी बळकटी मिळत आहे. बॉलिवूड निर्माते मधू मंटेना या मोठ्या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. राम चरणने 'हाय पापा'चे दिग्दर्शक शौर्यव यांना मान्यता दिल्याचे वृत्त आहे, परंतु अद्याप काहीही निश्चित झालेले नाही.



# 'हा' फक्त चित्रपट नाही, तर एक भावना आहे

तेलुगू स्टार अल्लू अर्जुनने 'पुष्पा २: द रुल'च्या यशाबद्दल चाहते आणि दिग्दर्शकांचे आभार मानले. अल्लू अर्जुन म्हणाला की हा फक्त एक चित्रपट नाही तर एक भावना आहे. याशिवाय, अल्लू अर्जुनने चाहत्यांना आणखी अभिमान वाटेल असे आश्वासन दिले आहे. अल्लू अर्जुन म्हणाला, माझ्यासाठी 'पुष्पा २' हा चित्रपट नाही तर पाच वर्षांचा प्रवास आणि एक सुंदर भावना आहे. मी चित्रपटाचे संपूर्ण प्रयत्न आणि यश माझ्या सर्व चाहत्यांना आणि माझ्या चाहत्यांना समर्पित करू इच्छितो. तुमच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल धन्यवाद, मी तुम्हाला सर्वांना आणखी अभिमान देईन, मी वचन देतो. हे एक उत्तम पाऊल आहे. मी तुम्हाला सर्वांना अभिमान देईन. 'पुष्पा'च्या यशामागे फक्त एकच माणूस आहे आणि तो म्हणजे दिग्दर्शक सुकुमार, असे अल्लू अर्जुनने या कार्यक्रमात सांगितले. हे पूर्णपणे त्याचे यश आहे. ही सगळी त्याची कल्पनाशक्ती आहे, आपण सर्व त्याची पात्रे आहोत. तो दिग्दर्शक सुकुमारचा खूप मोठा चाहता असल्याचे सांगितले. दिग्दर्शक सुकुमारबद्दल अल्लू अर्जुन म्हणाला, आम्हाला जिंकवल्याबद्दल खूप खूप धन्यवाद, संपूर्ण तेलुगू चित्रपट उद्योगाच्या वतीने आम्हाला अभिमान वाटल्याबद्दल धन्यवाद. आम्ही सर्व तुमचे आभारी आहोत. माझ्यासाठी, सुकुमार हा एक व्यक्ती नाही तर एक भावना आहे. मी तुमचा सर्वात मोठा चाहता आहे. मी माझ्या मित्रांना आणि कुटुंबियांना सांगत राहतो की मी तुमच्या जवळ आहे याचा मला आनंद आहे, तुम्ही एक प्रतिभावान व्यक्ती आहात.





भारतीय तेलुगू चित्रपट अभिनेता महेश बाबू त्याच्या उत्कृष्ट चित्रपट आणि ॲक्शन दृश्यांसाठी नेहमीच चर्चेत असतो. महेश बाबू शिल्पा शिरोडकरसोबतही रिलेशनशिपमध्ये आहे. शिल्पाची बहीण नम्रता शिरोडकर ही महेश बाबूची पत्नी आहे. शिल्पाने आता महेश बाबूबद्दल काहीतरी सांगितले आहे. शिल्पा शिरोडकरने भारती सिंगच्या पॉडकास्टमध्ये म्हटले आहे की, तो खरोखरच तरुण होत चालला आहे. एवढेच नाही तर महेश खरोखरच सर्वोत्तम अभिनेता आहे. तो खूप मेहनत करतो. सर्व कलाकार खूप मेहनत करतात, पण मी महेशचे

# महेश बाबूला पार्टी करायला जास्त आवडते

काम पाहते. म्हणून मी हे म्हणू शकते. शिल्पा म्हणाली की, ती महेशला खूप जवळून ओळखते आणि म्हणूनच ती म्हणू शकते की तो दिवसातून दोनदा कसरत करतो. त्याला साधे घरी शिजवलेले जेवण आवडते. काहीही असो, तो सगळा तुमच्या मनाचा आणि हृदयाचा खेळ आहे. शिल्पाने सांगितले की, महेश बाबूला पार्टी करायलाही आवडत नाही.
महेश बाबू यांनी 'मुफासा: द लायन किंग' लाही आवाज दिला. चित्रपटाच्या तमिळ आवृत्तीला दिलेल्या आवाजामुळे हा चित्रपट खूप चर्चेत आला. आता महेश बाबू यांनी चित्रपटात मुफासाला आवाज दिला आहे. या चित्रपटाबद्दल महेश बाबू म्हणाले, मुफासा हे प्रत्येक पिढीचे आवडते पात्र आहे. कुटुंबासोबत चित्रपट पाहण्याचा अनुभव अत्यंत समाधानकारक असेल. हा माझ्यासाठी खूप मोठा सन्मान आहे.
कामाबद्दल बोलायचे झाले तर, महेशशी लग्न केल्यानंतर निमरताने अभिनय सोडला. दरम्यान, महेश 'डडचइ२९' चित्रपटाची तयारी करत आहे. या चित्रपटात महेश बाबू मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. SSMB29 हा चित्रपट १४ एप्रिल २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होऊ शकतो.



# श्रीलीला करणार बॉलीवूडमध्ये पदार्पण

अभिनेत्री श्रीलीला 'पुष्पा २' मधील 'किसिक' गाण्यामुळे चांगलेच चर्चेत आली. यातील तिच्या डान्सने चाहत्यांना घायाळ केले. या गाण्यामुळे मिळालेल्या लोकप्रियतेनंतर आता श्रीलीला बॉलीवूडमध्ये डेब्यु करणार आहे. कार्तिक आर्यनसोबत ती मुख्य भूमिकेत झळकणार असल्याचे म्हंटले जात आहे. 'पुष्पा २' मधील 'किसिक गाण्यामुळे श्रीलीलाच्या अभिनयाची आणि मोहकतेची चर्चा होऊ लागली आणि त्यानंतर ती बॉलिवूडमध्ये संधी मिळवण्याच्या मार्गावर आहे. आता तिला कार्तिक आर्यनसोबत एका रोमँटिक चित्रपटात लीड रोल मिळाला आहे, ज्यामुळे तिच्या आगामी बॉलिवूड डेब्यूसाठी चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. या चित्रपटाचे पहिले नाव 'आशिकी ३' ठेवण्यात आले होते, परंतु काही वादांमुळे ते बदलण्यात आले आहे. चित्रपटाच्या नवीन नावाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. सुरुवातीला या चित्रपटात तृप्ती डिमरीला या भूमिकात घेणयात आले होते, परंतु काही कारणास्तव तिला हा प्रोजेक्ट सोडावा लागला. यानंतर श्रीलीलाला या प्रोजेक्टबाबत विचारताच तिने लगेचचं होकार दिला. श्रीलीला आणि कार्तिक आर्यन यांची केमिस्ट्री मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते खूप उत्सुक आहेत. याशिवाय, श्रीलीला इब्राहिम अली खानसोबत एक मॅडॉक फिल्म्सच्या प्रोजेक्टमध्ये दिसणार असल्याचे म्हंटले जात आहे. श्रीलीला आता बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवताना आपल्या करिअरच्या नव्या टप्प्यावर पोहोचली आहे. श्रीलीलाने चित्रपटसृष्टीत आपली कारकीर्द २०१७ साली 'चित्रांगदा' या चित्रपटातून बालकलाकार म्हणून सुरू केली होती. तिचा अभिनय आणि डान्स कौशल्य यामुळे तिला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली आहे. आता ती बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी सज्ज झाली आहे.

# कम्फर्ट झोन हा तुमचा शत्रू



अभिनेत्री रकुल प्रीत सिंगने अनेक हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. सोशल मीडियावर देखील ती नेहमी सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. नुकतेच तिने एक मोटिवेशनल पोस्ट शेअर केली आहे. याद्वारे तिने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. रकुल प्रीत सिंगने सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, प्रत्येकाला आपला कफ्मर्ट झोन हा कायमच चांगला वाटतो, पण कफ्मर्ट झोन कधीच आपल्याला पुढे जाऊ देत नाही. तुमचा कम्फर्ट झोन हा तुमचा शत्रू आहे. त्यामुळे तुमची कधीच प्रगती होऊ शकत नाही, अशा आशयाची पोस्ट तिने सोशल मीडियावर शेअर केली आहे. सध्या रकुल प्रीत सिंग तिचा आगामी सिनेमा 'मेरे हसबंड की बिवी'मुळे प्रसिद्धी झोतात आली आहे. या चित्रपटात रकुलसह अभिनेता अर्जुन कपूर आणि भूमी पेडणेकर हे कलाकार पाहायला मिळणार आहे. 'मेरी हसबंड की बिवी'मध्ये कॉमेडी आणि धमाल पाहायला मिळणार आहे.

मुदस्सर अजीझ यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केले आहे. तर जॅकी भगनानी आणि वासू भगनानी यांच्या पूजा एंटरटेनमेंटने या सिनेमाची निर्मिती केलीय. २१ फेब्रुवारी २०२५ ला हा सिनेमा संपूर्ण भारतात रिलीज होणार आहे. चाहतेही रकुलच्या आगामी चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. याशिवाय ती 'दे दे प्यार दे २', 'इंडियन ३' या चित्रपटात देखील पाहायला मिळणार आहे.